# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - ११ डिसें २०२४

---

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा माहितीपट (डॉक्युमेंटरी) शनिवार दि.१४ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता डी.डी. नॅशनल टेलिव्हिजन चॅनलवर प्रसारीत होणार आहे.

केंद्रीय शिक्षण आणि कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय तसेच परराष्ट्र मंत्रालयाने संयुक्तपणे भारतातील शिक्षणविषयक पोर्टल सुरु केले आहे. भारताचा प्रचार जागतिक अभ्यासाचे केंद्र म्हणून व्हावा आणि भारतीय उच्च शिक्षण संस्थांबाबत जागरुकता वाढावी यासाठी ॲकॅडमी फॅार लायझन इन इंटरनॅशनल एज्युकेशन मॅनेजमेंट तर्फे डी.डी. नॅशनल टेलिव्हिजनवर ॲव्हॅन्यूज ऑफ एक्सलन्स या मालिकेअंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा माहितीपट शनिवारी सकाळी ९.३० वाजता प्रसारित होणार आहे. या माहितीपटात विद्यापीठात उपलब्ध अभ्यासक्रम, सुविधा, इतर उपक्रम यांची माहिती दिली जाणार आहे. खान्देशातील व खान्देशाबाहेरील शिक्षणक्षेत्रातील घटक, विद्यार्थी, पालक यांनी हा माहितीपट आवर्जून पाहावा असे आवाहन कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी केले आहे. हा माहितीपट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देखील पाहता येणार आहे.

## बातमी क्र. २

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाअंतर्गत उत्कृष्ट महाविद्यालय / परिसंस्था तसेच उत्कृष्ट प्राचार्य, संशोधक, शिक्षक, कर्मचारी आणि परीक्षेचे केंद्रीय मूल्यांकन प्रकल्प राबविणारे उत्कृष्ट महाविद्यालये यांचा कार्यगौरव सोहळा शनिवार दि.१४ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठात होणार आहे.

विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात सकाळी १०.३० वाजता हा सोहळा होणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी राहतील. विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. के.बी. पाटील यांच्या हस्ते हे पुरस्कार दिले जाणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. राजेंद्र नन्नवरे यांची उपस्थिती असणार आहे. विद्यापीठाअंतर्गत पुरस्कार प्राप्त उत्कृष्ट महाविद्यालय / परिसंस्था तसेच उत्कृष्ट प्राचार्य, संशोधक, शिक्षक, कर्मचारी आणि परीक्षेचे केंद्रीय मूल्यांकन प्रकल्प राबविणारे उत्कृष्ट महाविद्यालये व समन्वयक यांची नावे विद्यापीठाने यापूर्वी जाहीर केली आहेत.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

**आपला विश्वासू**

**जनसंपर्क अधिकारी**